जा.क्र.७/'6425


॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

25 1994 - 2019 SILVER JUBILEE YEAR

Phone : (02462) 229242

Fax : (02462) 229574

**ACADEMIC (APPROVAL) SECTION**

Website: srtmun.ac.in

E-mail : approvalsrtmun@gmail.com


जा.क्र.शैक्ष/मान्यता/०२/२०१८–१९/3016

दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९
25

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : आपल्या महाविद्यालयात कार्यरत शिक्षकांनी महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून एम.फील/पीएच.डी. शैक्षणिक अर्हता धारण केलेली असेल त्यांचे सदर डिग्रीच्या पडताळणी संदर्भात.

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एफपीपी २४११/(प्र.क्र.२५९/१३)/विशि–३, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई, दिनांक ७ जून, २०१३.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शैक्ष/०२/२०१३–१४/५८८, दि. ०२/०८/२०१३.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शैक्ष/०२/२०१७–१८/२११८, दि. ०८/०१/२०१८.

महोदय,

उक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात कार्यरत सहाय्यक प्राध्यापक हे महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून एम.फील./पीएच.डी. ही शैक्षणिक अर्हता धारण केलेली असल्यास, त्या पदवी प्रमाणपत्राची पडताळणी करून प्रकरण परत्वे कार्यवाही करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये प्रस्तुत विद्यापीठाने परिपत्रकान्वये आपणास कळविले होते. त्याबाबतची सर्व कागदपत्रे Verification & Validity Certificate, Degree Certificate इत्यादी प्रमाणपत्रे त्वरित या कार्यालयास सादर करण्याबाबत संदर्भीय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते. परंतु वर्ष २०१३ ते २०१८ असा पाच वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही कांही महाविद्यालयातील कांही शिक्षकांचे एम.फील/पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र तपासणीसाठी पाठविलेले दिसून येत नाही. त्यामुळे सदरील डिग्रीची पडताळणी करण्यासाठी गठित समितीच्या बैठकांचे वारंवार आयोजन करावे लागत आहे. एम.फील./पीएच.डी. पदव्युत्तर पदवी महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून धारण करणा–या शिक्षकांनी नियमित/कायम मान्यता, कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ, अधिकचे वेतनमान (Additional Increments) इत्यादी बाबत यापुर्वी लाभ घेतलेला असल्यास सदर पदवीची पडताळणी अनिवार्य आहे.

सदर परिस्थितीचा विचार करता अशा शिक्षकांना ज्यांनी एम.फील./पीएच.डी. पदवी महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून धारण केलेली आहे. त्यांना त्यांची एम.फील./पीएच.डी. डिग्रीची पडताळणीची शेवटची संधी देण्यात येत आहे. यानंतर प्राप्त एम.फील./पीएच.डी. पदवी प्रमाणपत्राची पडताळणी या विभागामार्फत केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी व तसे आपल्या महाविद्यालयातील महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून एम.फील./पीएच.डी. डिग्रीची पदवी प्रमाणपत्राची तपासणी करून घेणार नाहीत त्यास संबंधित महाविद्यालय व शिक्षक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

मागे पहा...२..

Scanned by CamScanner

एम.फील./पीएच.डी. पदवीचे तपासणी/पडताळणी गठीत समितीकडून झालेली आहे, अशा शिक्षकांची महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून एम.फील./पीएच.डी. डिग्रीचे कागदपत्रे विद्यापीठात सादर करण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्रा बाहेरील विद्यापीठातून पीएच.डी./एम.फील पदवी धारण करून कार्यरत शिक्षकांची कागदपत्रे या कार्यालयास दिनांक १५/०३/२०१९ पर्यंत सादर करावीत. या तारखेनंतर आलेली अशा प्रकरणातील कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील कार्यरत शिक्षकांचे होणा—या नुकसानीस प्रस्तुत विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी, ही विनंती.

कुलसचिव

प्रत माहिति तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:
सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर पत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

Scanned by CamScanner